**// प्रेस नोट //**

**दिनांक 20/08/2018.**

**1) श्री.हरिभाऊ कुंडलीक घुले, सेवानिवृत्त-अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी, औरंगाबाद (वर्ग-1) व त्यांच्या पत्नी 2) पत्नी लक्ष्मीबाई हरिभाऊ घुले, मुलगा 3) अजित हरिभाऊ घुले, 4) अमर हरिभाऊ घुले, सर्व मुळ रा.टाकळी, ता.केज, जि.बीड यांचेविरुध्द उत्पन्नापेक्षा जास्त मालमत्ता निष्पन्न झाल्याने गुन्हा दाखल**

---

श्री.हरिभाऊ कुंडलीक घुले, सेवानिवृत्त-अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी, औरंगाबाद (वर्ग-1) यांचे मालमत्तेची चौकशी होणेबाबत अर्जदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड येथे तक्रार दिली होती. अर्जदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने श्री.हरिभाऊ कुंडलीक घुले, सेवानिवृत्त-अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी, औरंगाबाद (वर्ग-1) यांचे मालमत्तेची चौकशी करण्यात आलेली असुन सदर चौकशी दरम्यान श्री.हरिभाऊ घुले यांच्या सर्व ज्ञात व कायदेशीर मार्गाने मिळणा-या उत्पन्नापेक्षा रक्कम रुपये -18,37,973/- एवढया रक्कमेची (23.17%) अपसंपदा संपादीत केली असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे. तसेच सदर मालमत्ता संपादीत करण्यासाठी हरिभाऊ घुले यांच्या पत्नी लक्ष्मीबाई हरिभाऊ घुले, मुलगा अजित हरिभाऊ घुले व अमर हरिभाऊ घुले यांनी सहाय्य केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

त्यावरुन श्री.हरिभाऊ कुंडलीक घुले, सेवानिवृत्त-अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी, औरंगाबाद (वर्ग-1) यांचेविरुध्द पोलीस ठाणे केज येथे गु.र.नं. 368/2018 क.13 (1) (ब) सह 13 (2) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा (सुधारणा) 2018 व त्यांच्या पत्नी 2) पत्नी लक्ष्मीबाई हरिभाऊ घुले, व मुले नामे 3) अजित हरिभाऊ घुले, 4) अमर हरिभाऊ घुले, सर्व मुळ रा.टाकळी, ता.केज, जि.बीड ह.मु. N-3 सिडको, औरंगाबाद मुळ यांचे विरुध्द कलम 12 भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा (सुधारणा) 2018 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपअधी.श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील, आणि पोनि गजानन वाघ असेबी, बीड हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक डॉ.श्री.श्रीकांत परोपकारी साहेब, मा.श्री. जिरगे, अप्पर पोलीस अधीक्षक सो,असेबी औरंगाबाद, यांचे मार्गदर्शनाखाली पोउपअधी.श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील, पोनि. गजानन वाघ व कर्मचारी असेबी बीड व पोउपअधी. श्रीमती वर्षाराणी पाटील, असेबी औरंगाबाद यांनी केली आहे.

नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक/ लोकप्रतिनिधी लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| टोल फ्री क्रमांक | :- 1064 |
| दुरध्वनी क्रमांक | :- 02442/222649 |
| मेल आयडी | :- dyspacbbeed@gmail.com |
| वेबसाईट | :- www.acbmaharashtra.gov.in |
| मोबाईल ॲप | :- www.acbmaharashtra.net |
| फेसबुक पेज | :- www.facebook.com/MaharashtraACB |

20/8

**( बाळकृष्ण हनपुडे पाटील )**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड.**